पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

प्रेसनोट ०८/०२/२०२२

# मेडीकल कॉलेज मध्ये ॲडमिशन करुन देतो असे सांगुन, ४५ लाख रुपये रक्कमेचा गंडा घालणा-या १ आरोपीस अटक

## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

अर्जदार श्रीमती ग्यानदेवी अनिलकुमार ओझा रा. ई/१००३ ऑर्चिड नाहर अमृतशक्ती चांदीवली मुंबई यांची गैरअर्जदार किरण सुवर्णा रा.वल्लभनगर पिंपरी पुणे व सातारा येथील आय.एस.एन.आर.कॉलेजचे प्रमुख देशमुख यांनी त्यांची मुलगी आयशा हिचे एम.बी.बी.एस. करीता मेडीकल कॉलेज मध्ये ॲडमिशन करुन देतो असे सांगुन याने ४५ लाख रुपये रोख रक्कम घेऊन, ॲडमिशन न करता आर्थीक फसवणुक केली म्हणुन त्यांनी मा. कृष्ण प्रकाश सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडे तक्रारी अर्ज केला होता. मा.कृष्ण प्रकाश सो, यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अजय जोगदंड, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांना सदर अर्जाबाबत चौकशी करुन पुढील कायदेशीर कारवाई करणे बाबत आदेशीत केले होते.

वपोनि अजय जोगदंड यांनी अर्जदार श्रीमती ग्यानदेवी अनिलकुमार ओझा यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने चौकशी करता त्यामध्ये दिनांक ०७/०८/२०१६ ते दिनांक ०७/०२/२०२२ रोजी दरम्यान अे -२३६ एच.ए.कॉलनी वल्लभनगर जवळ पिंपरी पुणे येथे गैरअर्जदार किरण सुवर्णा व आय.एस.एन.आर.कॉलेजचे प्रमुख देशमुख यांनी अर्जदारास त्यांची मुलगी आयशा हिचे एम.बी.बी.एस. करीता मेडीकल कॉलेज मध्ये ॲडमिशन करुन देतो असे सांगुन, फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, त्या दोघानी पुर्व नियोजनाप्रमाणे संगनमत करुन, कट करुन, ४५ लाख रुपये रोख रक्कम देण्यास भाग पाडुन, गैरअर्जदार किरण सुवर्णा व देशमुख यांनी अर्जदार यांचे मुलीचे ॲडमिशन न करता, अर्जदाराकडुन घेतलेली ४५ लाख रुपये रोख रक्कम परत न करता त्यांची आर्थीक फसवणुक केली आहे असे चौकशीत निष्पन्न झाल्याने, त्याअनुषंगाने त्याबाबत डॉ.काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, डॉ.प्रशांत अमृतकर व पद्माकर घनवट सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनप्रमाणे वपोनि अजय जोगदंड यांनी अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारी वरुन **पिंपरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ७२/२०२२ भादवि कलम ४०६,४२०,४६५,१२०(ब),३४ अन्वये** गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी किरण यादव सुवर्णा, वय- ४६ वर्षे, रा. ३८/३०३, बजाज टेम्पो सोसा, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे यास दिनांक ०८/०२/२०२२ रोजी अटक केले आहे. अटक आरोपीची दिनांक १२/०२/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडी घेण्यात आली असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास पिंपरी पोलीस स्टेशनचे पोलीस उप-निरीक्षक एन.जी.पंतगे हे करीत आहे.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त डॉ.श्री.संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त डॉ.श्री. काकासाहेब डोळे, सहा.पोलीस आयुक्त डॉ.प्रशांत अमृतकर व पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय जोगदंड, पिंपरी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर अवताडे, पोलीस उप-निरीक्षक अनिरुध्द सावर्डे, एन.जी.पतंगे, सुर्यवंशी, खंडणी विरोधी पथकातील सहा.पोलीस उप-निरीक्षक अशोक दुधवणे, पोलीस अंमलदार प्रदीप गोडांबे, किरण काटकर, प्रदीप गायकवाड, तसेच पिंपरी पोलीस स्टेशनचे प्रमोद भांडवलकर, राजा बारशिंगे व मोहसीन शेख यांचे पथकाने केली आहे.